# भारताचा आध्यात्मिक प्रवाह

संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार, सिंधू नदीपलीकडे असणाऱ्या भारतीय लोकांना कौलाघात 'हिंदू' असे म्हटल्या जाऊ लागले. परंतु आणखी खोलात जाऊन शोध घेतल्यास असे आढळते की, या भारतभूमीत आर्य आणि द्रविड अशा दोन्ही संस्कृती एकाचवेळी नांदत होत्या. म्हणूनच या दोन्ही संस्कृतींना आपल्या कवेत घेणारे 'भारतीयत्व' हे नामकरण, हिंदुत्वापेक्षा अधिक सोपे आणि उचित वाटते. वर नमूद दोन्ही संस्कृतींमधील मूल्यांमध्ये, त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यांमध्ये, शिवाय त्या-त्या काळातील आध्यात्मिक प्रवाह आणि दैवी साधनांमध्ये हिंसेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते. अगदी आधुनिक भारतातील राष्ट्रीय प्रवाहातही हिंसेने फार मोक्याचे स्थान पटकावल्याचे दिसते; तसेच महात्मा गांधींच्या आंतरिक व बाह्य मूल्यांमध्येसुद्धा हिंसेचा आध्यात्मिक प्रभाव जाणवतो. परंतु गांधींच्या

विचारधारेसोबतच त्यांच्या आध्यात्मिक प्रवाहामध्ये दया, परोपकार आणि अहिंसा अशा मूल्यांचाही प्रभावी ठसा आढळतो. तरीसुद्धा मोहनदास गांधी या माणसाच्या वैयक्तिक स्वभावातील विशिष्ट ठेवणीमुळे, 'अहिंसा' हा घटक तिथे अधिक महत्त्वाचा ठरला. अगदी जवाहरलाल नेहरू यांच्या स्वभावाची ठेवणदेखील तशीच हिंसा न पेलवणारी दिसते.

भारतीय संस्कृतीची आध्यात्मिक मशागत झालेल्या महात्मा गांधींच्या मनावर अपरिग्रह, वैभवाचा त्याग, परोपकार, दयाभाव यांसारख्या मूल्यांचा प्रभाव असल्याने सामान्य भारतीय जनमानस हे त्यांच्याकडे आकृष्ट झाले. परिणामी भारतातील जनसामान्यांच्या मनात गांधीप्रणीत कॉंग्रेसची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विचारधारा रुजू लागली. अर्थात भारताच्या आध्यात्मिक विचारधारेतील हिंसा ही भारतीयांच्या बाह्य जीवनशैलीत ठाण मांडून होतीच; पण गांधी-नेहरू या व्यक्तींच्या स्वभावाला ती आवडत नव्हती.

अगदी गांधींच्या हिंसक मृत्युनंतरदेखील त्यांची अहिंसा ही भारताच्या राष्ट्रीय विचारमूल्यात ठोसपणे कार्यरत राहिली - **तिचे स्थान हे बऱ्यापैकी अढळ राहिले.** परंतु १९६२ साली भारतावर चीनने आक्रमण केले आणि त्यानंतर राष्ट्राचा राज्यकारभार हाकणाऱ्या विचारपद्धतीतून अहिंसेचे अवास्तव स्तोम हे कमी होत गेले. त्याऐवजी रामायण व महाभारतातून प्रवाहित झालेली 'जीवनाच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी हिंसेची सार्थकता' इथे प्रगटू लागली. त्यामुळे पुढे कॉंग्रेसपेक्षा जनसंघ वा भाजपची विचारसरणी ही प्रमुख राष्ट्रीय विचारधारा म्हणून उसळू लागली.

भारतामध्ये कार्यरत असलेल्या आध्यात्मिक मूल्यांना भारताच्या राष्ट्रीय, सामाजिक, कौटुंबिक आणि आंतरराष्ट्रीय विचारसरणीत आणण्यासाठी कॉंग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांमुळे एक मोठीच शक्यता निर्माण झाली. तसेच आमचे भारतीय संविधान देखील या संभावनेला पुष्कळ मुभा देत असल्याचे जाणवते.

**किशोरच्या जीवनप्रवाहात वरील सर्व मूल्ये नि विचार हे प्रवास करीत आले आहेत आणि भारतीयत्वाला भरपूर मुभा देत राहिले आहेत.**

**- किशोरच्या जीवनातील**
**एक सहप्रवासी मोहन**